# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/11/2022 (सोमवार) सकाळ

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत मौदा ओम साई नगर येथे दिनांक १३/११/२०२२ चे ११.३० वा. ते ११.५० वा. दरम्यान फिर्यादी नामे– आशिष ताराचंद कुंभलकर, वय ३२ वर्ष, रा. ओम साई नगर, मौदा याचा मोठा भाऊ नामे–शंकर कुंभलकर हे दोघेही एकाच घरी वेगवेगळे राहात असुन फिर्यादीचा मोठा भाऊ हा NTPC येथे ज्युनियर टेक्नीशियन या पदावर कार्यरत असुन तो कंपनीच्या कामानिमीत्त्य आपल्या परिवारासह दिनांक १०/११/२०२२ रोजी दिल्लीला गेला. त्याच्या घराची चाबी फिर्यादीकडे दिली होती. यातील नमुद घटनावेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हा बस स्टॉप वर हजर असता फिर्यादीच्या पत्नी ने फोन करून सांगितले की, "मी किचन मध्ये काम करीत आहे मला भाऊच्या रूम मधुन आलमारी उघडण्याचा आवाज येत आहे तुम्ही घरी या" असे म्हटले असता फिर्यादीने घरी जावुन पाहीले तेव्हा बाहेरील दरवाज्याचे लॉक तुटलेले दिसले. फिर्यादीने आमतध्ये जावुन पाहीले असता ड्रसिंग रूममध्ये ठेवलेली लाकडी आलमारी तुटलेली दिसली. तसेच किचनच्या बाजूला असलेल्या बेडरूममध्ये ठेवलेली लोखंडी आलमारी ही पण तुटलेली व उघडी दिसली. तिच्या आतमधले सामान अस्ताव्यस्त दिसले. तेव्हा फिर्यादीने भावाला फोन करून सांगितले की, तुझ्या घरी चोरी झालेली आहे. तेव्हा माझ्या भावाने फिर्यादीला सांगितले की, "मी ड्रेसिंग रूम मध्ये असलेल्या लाकडी आलमारी मध्ये १२ ग्रॅम सोन्याचे गोप किमती १७०००/–रू., ०५ ग्रॅम सोन्याची अंगठी किमती ५०००/–रू, नगदी २५०००/–रू., दोन टायटन घडी किमती १००००/– असा एकुण ५७,०००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**एमआयडीसी बोरी** :– अंतर्गत गणेशपुर सहारे, लेआउट लेकचंद हिंगणा येथे दिनांक १३/११/२०२२ चे ००.०० वा. ते दिनांक १४/११/२०२२ चे ०७.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– मंगलप्रसाद भैयालाल बिसेन, वय ३८ वर्ष, रा. यांची स्प्लेंडर मोटरसायकल क्र एम.एच.– ३६/एन– ६५४८ किमती १०,०००/– रू. ची आपल्या राहत्या घराच्या समोर उभी करून ठेवली व दुसऱ्या दिवशी सकाळी बघितली असता दिसुन आली नाही. आजु बाजुला शोध घेतला मिळुन न आल्याने सदर मोटरसायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन एमआयडीसी बोरी करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर